# RTE Act-2009 अंतर्गत
# शाळा मान्यता (नमुना-दोन)

जावक क्र.:- जि.प.चं.प्रा./RTE/शा.मा./ 216 /2025 दिनांक :- 29 / 07 /2025
जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांचे कार्यालय, दुरध्वनी :- 07172-252560
जिल्हा - चंद्रपूर, राज्य - महाराष्ट्र ई मेल :-eopzpchandrapur@gmail.com

**प्रति,**

**अध्यक्ष / सचिव,**
**नालंदा एज्युकेशन सोसायटी, आवाळपुर.**

**विषय - बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, 2009 यांच्या कलम 18 च्या प्रयोजनार्थ, बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, 2011 याच्या नियम 11, पोट नियम (4) अन्वयक शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबावत.**

**संदर्भ** -1) शिक्षणाधिकारी (प्राथ), जिल्हा परिषद, चंद्रपुर यांचे पत्र क्रं./1615/84 दि.05/11/1984 दि. 5/11/1984
2) शिक्षणाधिकारी (प्राथ), जिल्हा परिषद, चंद्रपुर यांचे पत्र क्रं./177/86 दि.14/03/1986
3) मा. शिक्षण उपसंचालक,नागपूर विभाग, नागपूर यांचे पत्र क्र./अनु/क/6789/87, दिनांक 27/08/1987.
4) NO.NOC- 2009/519/09 SE-1 मंत्रालय मुंबई 32 -दिनांक 01/07/2009
5) No.CBSE/1130049-EX-05365-2425/2024-25 दिनांक 19/09/2023
6) मा. शिक्षण उपसंचालक नागपुर यांचे पत्र क्रमांक 15927-33 दिनांक 30/06/2008
7) शिक्षणाधिकारी (प्राथ), जिल्हा परिषद, चंद्रपुर यांचे पत्र क्र./RTE/शा.मा./344/2022 दि.15/12/2022
8) मुख्याध्यापक, **दि आदित्य बिर्ला पब्लिक स्कुल,CBSE आवाळपुर, ता. कोरपना** यांचे पत्र दि. 20/07/2025
9) गटशिक्षणाधिकारी, पं.स. कोरपना, यांचा शाळा तपासणी अहवाल दि. 21/07/2025

**महोदय/महोदया,**

संदर्भ पत्र क्र. 1 नुसार **नालंदा एज्युकेशन सोसायटी**, आवाळपुर व्दारा संचालित **दि आदित्य बिर्ला पब्लिक स्कुल, CBSE आवाळपुर या (CBSE) इंग्रजी** माध्यमाच्या खाजगी शाळेला, **जुन** 1984 पासुन कायम विना अनुदानीत तत्वावर खाजगी प्राथमिक शाळा **इयत्ता 1 ली ते** 5 वी चे वर्ग,(इंग्रजी माध्यम) " खास बाब" म्हणुन सुरू करण्यास परवानगी दिलेली आहे. संदर्भ क्र. 2 नुसार, 1985-86 पासुन "खास बाब" म्हणुन **इयत्ता 6 व 7 वी** चे वर्ग, व संदर्भ क्र. 3 नुसार, जुन 1987 पासुन **इयत्ता 8 वी** चे वर्ग, कायम विना अनुदानीत तत्वावर नविन माध्यमिक शाळा सुरू करण्यास परवानगी दिलेली आहे. संदर्भ क्र. 4 नुसार, CBSE चे वर्ग चालविण्याकरिता अटि व शर्तिचे आधारावर नाहरकत प्रमाणपत्र (NOC) पत्र दिलेले आहे. संदर्भ क्र. 5 नुसार, **दि.01/04/2024 ते** 31/03/2029 करिता General Affiliation पत्र दिलेले आहे. संदर्भ क्र. 6 नुसार, स्टेला मॅरीस कॉन्व्हेंट हायस्कुल, आवाळपुर या शाळेचे जुने नाव बदलुन दि आदित्य बिर्ला पब्लिक स्कुल, आवाळपुर असे बदलानंतर नोंद घेण्यात आलेली आहे. संदर्भ क्र. 7 नुसार, RTE Act-2009 अंतर्गत **दिनांक- 01/02/2022 पासून दिनांक- 31/01/2025** या कालावधीसाठी **इयत्ता** 1 **ते** 8 करीता शाळा मान्यता (नमुना-दोन) प्रमाणपत्र दिलेले आहे. सदर मान्यतेचा कालावधी संपुष्टात आल्याने, दिनांक संदर्भ क्र. 8 नुसार,शाळेचे मुख्याध्यापकांनी शाळेला मान्यता देणेबाबत प्रस्ताव सादर केलेला आहे.

संदर्भ क्र. 9 नुसार, गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती **कोरपना**, यांनी सदर शाळेची तपासणी करून अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे. त्या अहवालानुसार सदर शाळेत सद्या इयत्ता 1 **ते** 12 चे वर्ग उपलब्ध आहेत. **तसेच सदर शाळा** RTE Act-2009 मधील भौतिक सुविधांच्या मानकांची पूर्तता करण्याच्या अटीवर शळेला मान्यता प्रदान करण्याकरीता हरकत नसल्याचे नमुद केलेले आहे. त्याआधारे **दि.-01/02/2025 पासून** दि.-31/01/2028 पर्यंत तीन वर्षाच्या कालावधीसाठी **इयत्ता 1 ते 8 करीता दि आदित्य बिर्ला पब्लिक स्कुल, CBSE आवाळपुर** या शाळेस खालील अटी व शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन राहुन शाळा मान्यता (नमुना-दोन) देण्यात येत आहे.
**वरील मान्यता हीखालील शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन आहे-**

1. मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवी नंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.
2. बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, 2009 (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, 2011 (जोडपत्र दोन) मधील तरतूदीचे, शाळा पालन करील.
3. शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना, पहिल्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान 25% मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पुर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल. परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.
4. परिच्छेद 3 मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरीता शाळेला अधिनियमाच्या कलम 12(2) नुसार प्रतिपूर्ती मिळेल, अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.
5. संस्था/शाळाकोणतीही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकास किंवा त्याच्या किंवा तिच्या मात्या-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.
6. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी; धर्म, जात, किंवा वंश, जन्मठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.
7. (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखुन ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत काढून टाकण्यात येणार नाही.
(दोन) कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.
(तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.



Scanned by CamScanner

(चार) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास, नियम 23 अन्वये निर्धारित प्रमाणपत्र देण्यात येईल.

(पाच) विकलांग / विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करण्यात येईल.

(सहा) अधिनियमाच्या कलम 23(1) अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणा-या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणा-या शिक्षकांना अशी किमान अर्हता 5 वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

(सात) अधिनियमाच्या कलम 24(1) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची / तिची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील.

(आठ) शिक्षकाने / शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वत:ला गुंतवून घेऊ नये, याची सुनिश्चिती शाळा करील.

8. शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठयक्रमाचे पालन करील.
9. शाळा, अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.
10. शाळा अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील.

**तपासणी अहवालानुसार शाळेत खालीलप्रमाणे सुविधा उपलब्ध आहेत-**

- शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ - 42289.64 **चौ.मी.**
- एकूण बांधकाम क्षेत्रफळ - 3660 **चौ.मी.**
- खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ -14720 **चौ.मी.**
- वर्गखोल्यांची संख्या - 28
- कार्यालय-नि-भांडार-नि-मुख्याध्यापकाची खोली उपलब्ध आहे काय ?-**आहे**.
- मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधन गृहे- जेथे वापरण्यासाठी व प्रसाधन गृहे आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी आहे काय ?- **आहे (कमोड आहे)**
- पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध आहे काय ? - **आहे**.
- दुपारचे जेवण शिजवण्यासाठी स्वयंपाकघर उपलब्ध आहे काय ? - **नाही. (लागु नाही)**
- अध्यापन अध्ययन साहित्य / खेळ व क्रीडा विषयक सामग्री / ग्रंथालय यांची उपलब्धता उपलब्ध आहे काय ? - **आहे**.
- वाचन साहित्य विनासायास उपलब्ध आहेत काय ? - **आहे**.
- सर्व सुविधा विना अडथळा (रॅम्प) उपलब्ध आहे काय ? - **आहे**.
- शाळेला संरक्षण भिंत उपलब्ध आहे काय ? - **आहे**.
- शाळेत अग्निशमनयंत्र उपलब्ध आहे काय ? - **आहे**.

11. शासनाची मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र, चालविता येणार नाहीत.
12. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.
13. शाळा, सोसायटी नोंदणी अधिनियम, 1860 (1860 चा 21) किंवा मुंबई सार्वजनि विश्वस्त व्यवस्था अधिनियम, 1950 अन्ये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.
14. शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्ती संघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरिता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.
15. शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखा परिक्षित व प्रमाणित करून घ्यावेत आणि नियमानुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरण पत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिका-यांकडे पाठविण्यात यावी.
16. तुमच्या शाळेला मिळालेला मान्यता संकेतांक 27130713405 असा आहे, हा सांकेतांक या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करतांना कृपया तो नमूद करावा, याची नोंद घ्यावी.
17. शिक्षण संचालक / जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सूचनांचे पालन करावे.
18. संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही नूतनीकरण असल्यास, नूतनीकरण केल्याची सुनिश्चितता करावी.
19. बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम - 2009 प्रमाणे शाळेला आवश्यक असणा-या बाबी पूर्ण असने आवश्यक आहे. तसेच संदर्भिय तपासणी अहवालाच्या आधारे,तसेच अपूर्ण असलेल्या **भौतिक** सुविधांच्या **मानकांची पूर्तता तिन महिन्याचे आत पूर्ण करण्याचे अटीवर** शाळेला हे शाळा मान्यता (नमुना-दोन) **प्रमाणपत्र प्रदान** करण्यात येत आहे. परंतू प्रत्यक्ष फेरतपासणीच्या वेळी कोणत्याही प्रकारच्या त्रुटी आढळून आल्यास तथा अपुर्ण मानकांची पूर्तता मुदतीत न केल्यास **आपल्या शाळेची मान्यता व सदर शाळा मान्यता (नमुना-दोन) प्रमाणपत्र त्यापूढे आपोआप रद्द समजण्यात येईल, हयाची नोंद घ्यावी.**

Signed by
Ashwini Dhiraj Kelkar
Date: 29-07-2025 18:18:4

शिक्षणाधिकारी (प्राथ.)
जिल्हा परिषद, चंद्रपूर

**प्रतिलिपी :-** 1 . मुख्याध्यापक, दि आदित्य बिर्ला पब्लिक स्कुल, CBSE आवाळपुर यांना माहितीस अग्रेषीत.

2. गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, कोरपणा यांना माहितीस तथा उचित कार्यवाहीस अग्रेषीत. सदर शाळा मान्यता नमुना- दोन चे प्रमाणपत्र संबंधित शाळेचे मुख्याध्यापक / अध्यक्ष / सचिव यांना पोहोचते करुन पोच घ्यावी. व पोचपावती या कार्यालयास तात्काळ सादर करावी.





Scanned by CamScanner